वर्ष-०७ | अंक-३८ | मुंबई, मंगळवार १० ते १६ ऑगस्ट २०२१ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

YouTube

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक • कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक

PG 2 पुण्यात गुटखाविक्रत्यांची पुन्हा झाडाझडती; शहरात 30 ठिकाणी छापे

3 → 'सेल्फी' काढण्याच्या नादात जीव गेला; बोट उलटून एकाचा बुडून मृत्यू

भयावह! घरात घुसून नराधमाने केला अल्पवयीन मुलीवर बलात्कार; हतबल भावाने हात जोडून विनवणी केली पण ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## नियमांचे उल्लंघन करत गोवंडीत अबू आझमी यांची मिरवणूक



मुंबई: समाजवादी पक्षाचे शिवाजी नगर-मानखुर्द विधानसभा सदस्य अबू असीम आझमी यांची रविवारी त्यांच्या वाढदिवसानिमित्त गोवंडीच्या शिवाजीनगरमध्ये मिरवणूक काढण्यात आली. यावेळी शेकडो जण सहभागी झालेल्या या मिरवणुकीत करोना नियमांचे सर्रास उल्लंघन करण्यात आले. राज्यात सध्या करोनाचा प्रादुर्भाव कमी होत असला तरी करोना पूर्णपणे संपलेला नाही. त्यामुळे सरकारकडून अद्यापही अनेक निर्बंध कायम ठेवण्यात आले आहेत. मात्र लग्नसमारंभ, उद्धाटन इत्यादींचे ...पान २ वर...

# १५ ऑगस्टपासून लोकल प्रवासमुभा!

## -मुख्यमंत्र्यांची घोषणा





मुंबई : करोना रुग्णसंख्या घटल्याने निंबध शिथिल करण्यासाठी जनमताचा दबाव आणि लशीच्या दोन मात्रा घेतलेल्यांना रेल्वे प्रवासाला मुभा देण्याबाबत विचार करण्याच्या उच्च न्यायालयाच्या सूचनेनंतर अखेर १५ ऑगस्टपासून सर्वसामान्यांना उपनगरी रेल्वेतून प्रवासास परवानगी देण्याची महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रविवारी केली. मात्र, त्यासाठी दोन लसमात्रा घेऊन १४ दिवस पूर्ण झाल्याची अट आहे. उपाहारगृहे, धार्मिकस्थळे आणि मॉल्सबाबतही लवकरच निर्णय घेण्याचे संकेत समाज माध्यमा द्वारे राज्यातील जनतेशी संवाद साधताना मुख्यमंत्र्यांनी मुंबई महानगर प्रदेशातील लाखो नोकरदारांना दिलासा दिला. रेल्वेसेवा सुरू करण्याबाबत जनमताचा रेटा

### दोन लसमात्रा घेतलेल्यांना लाभ; उपाहारगृहे, मॉलबाबत लवकरच निर्णय

वाढला होता. रेल्वे सुरू करण्याबाबत सरकारने विचार करावा, अशी सूचना उच्च न्यायालयाने केली होती. या पाश्र्वभूमीवर स्वातंत्र्यादिनापासून सर्वसामान्यांना रेल्वेसेवेची मुभा मिळणार आहे. मुंबईतील १९ लाख नागरिकांचे लसीकरण पूर्ण झाले असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. रेल्वेसेवेसाठी राज्य सरकारच्या वतीने तयार करण्यात आलेल्या ॲपवर किं वा शहरातील महापालिकांच्या कार्यालयातून क्यूआर कोड मिळविणे आवश्यक असेल. ॲपवर लसीकरण पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. त्यानंतरच परवानगी पत्र मिळेल. क्यूआर कोड दाखवल्यावरच रेल्वे तिकीट खिडकीवर मासिक पास अथवा दैनंदिन तिकीट मिळू शके ल. गेल्या एप्रिलपासून सर्वसामान्यांसाठी बंद असलेली रेल्वेसेवा जवळपास चार महिन्यांनी पुन्हा सुरू होत आहे. गेल्या आठवड्यापासून दुकानांच्या वेळा वाढविण्यात आल्या होत्या. परंतु, उपाहारगृहांना सायंकाळी ४ पर्यंतच परवानगी आहे. उपाहारगृहांची वेळ वाढविणे, धार्मिकस्थळे आणि मॉल्स सुरू करण्याबाबत सोमवारी वैद्यकीय तज्ज्ञांच्या कृतिदलाच्या बैठकीत चर्चा के ली जाईल. टप्प्याटप्प्याने ८ ते १० दिवसांत हे सारे सुरू करण्याचे संके त मुख्यमंत्र्यांनी दिले. व्यापारी, उपाहारगृहांचे चालक आदींनी संयम सोडू नये, असे आवाहन त्यांनी के ले. तसेच काही उचापतखोर लोक व्यापारी व अन्य घटकांना चिथावत आहेत. करोनाचे संकट अद्याप संपलेले नसल्याने खबरदारी घ्यावी ...पान २ वर...

## राज्यातील चारही मनोरुग्णालयांचे 1500 कोटी खर्चून नवनिर्माण!



राज्यात एकूणच मानसिक रुग्णांची संख्या वाढत असून करोना काळात बेरोजगारी तसेच आजारपणातून मानसिक आधाराची गरज असलेले रुग्ण मोठ्या संख्येने आढळत आहेत. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने तब्बल १५०० कोटी रुपये खर्चून सध्या अस्तित्वात असलेल्या चारही प्रादेशिक मनोरुग्णालयांचे नवनिर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. ही चारही मनोरुग्णालये १०० वर्षांपूर्वीची असून नव्याने या रुग्णालयांची उभारणी केली जाणार आहे. राज्यात पुणे, ठाणे, नागपूर व रत्नागिरी अशा चार ठिकाणी आरोग्य विभागाची मनोरुग्णालये असून आरोग्य विभागाच्या विविध संस्थांच्या विकासासाठी 'आशियायी विकास बँके'कडून ५१७७ कोटी रुपये कर्ज घेण्यात आले आहे तर राज्य सरकारने आपल्या हिश्याचे २२९० कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहे. यातील १५०० कोटी रुपयांचा निधी चार मनोरुग्णालयांसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. मनोरुग्णालयांचा विकास हा आरोग्य विभागासाठी अत्यंत कळीचा मुद्दा होता. परिणामी निधी मंजूर झाल्यापासून मनोरुग्णालयांच्या विकासासाठी ...पान २ वर...

# पोलिसांवर जीवघेणा हल्ला करणाऱ्या 02 आरोपींना विष्णूनगर पोलिसांनी ठोकल्या बेड्या



फिर्यादी कोलते यांच्या राहत्या घरी आरोपी नवा : १) सोमेश नवनाथ म्हात्रे २) साहिल श्रीनिवास ठाकूर उर्फ वाल वालट्या हे फिर्यादी यांच्या घराबाहेर चकरा मारत असताना दिसला थोड्या वेळाने आरोपीने कोलते यांच्या घराचा दरवाजा ठोठावत होता / कोलते यांनीं आरोपीस दरवाजा ठोठावू नका असे सांगितल्यास दोन्ही आरोपीना राग आला, व आरोपी क्र. ०१ याने रागाच्या भरात कोलते यांस शिवीगाळ करून त्यांच्या डोळ्यावर हाताचे ठोशे मारले . व कोलते यांना मारण्याची धमकी देत त्यांचे गळयावर उजव्या बाजूला चाकूने वर करून दुखापत केली तसेच आरोपी साहिल याने लाकडी बांबूने पाठीवर व डोक्यावर मारून दुखापत केली. कोलते यांनी सदर गुन्ह्यांची तक्रार विष्णूनगर पोलीस स्टेशन येथे दाखल केली असता आरोपी वर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यांचा तपास हा विष्णूनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संजय साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण अधिकारी सपोनि. गणेश वडणे व पथक यांनी गुप्त बातमीदारा मार्फत आरोपी यांची जागा सतत बदलत असून देखील त्यांनी पान २ वर

# मुंबई महापालिकेची कडक कारवाई

## 'पिचकारी' बहाद्दरांकडून 39 लाखांची दंडवसुली



मुंबई महापालिकेच्या 'क्लिनअप मार्शल'पथकाने गेल्या ९ महिन्यात सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्या १९ हजारांपेक्षाही जास्त पिचकारी बहाद्दरांकडून प्रति व्यक्ती २०० रुपयांप्रमाणे ३९ लाख १३ हजार १०० इतकी दंड वसुली केली आहे. यासंदर्भातील माहिती उप आयुक्त (डॉ.) संगीता हसनाळे यांनी दिली आहे. मुंबई महापालिकेने 'स्वच्छ व सुंदर मुंबई' साठी २००६ मध्ये एक कायदा केला. या कायद्याच्या अंतर्गत रस्त्यावर, सार्वजनिक ठिकाणी घाण करणारे, थुंकणारे, लघुशंका करणारे, कचरा, डेब्रिज टाकणारे यांच्या विरोधात दंडात्मक कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू केली. यासंदर्भात पालिकेने खासगी संस्थेच्या सहभागाने 'क्लिनअप' मार्शल पथकाची नेमणूक केली.
त्यानुसार, रस्त्यावर, सार्वजनिक ठिकाणी घाण करणाऱ्या, थुंकणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाईचा बडगा उगारण्यात येत आहे. मुंबई महापालिका नागरिकांना विविध नागरी सुविधा देताना आपल्या नागरिकांच्या आरोग्याची काळजी देखील नियमितपणे घेत असते. या अंतर्गत आरोग्य सुविधा देण्यासोबतच आरोग्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा अवलंबही सातत्याने करण्यात येतो. याअंतर्गत सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यास प्रतिबंध व्हावा, यादृष्टीने जनजागृतीपर आणि दंडात्मक कारवाई देखील सातत्याने करण्यात येते. सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यामुळे कोरोना, क्षयरोग यासारख्या विविध रोगांचा प्रसार होऊ शकतो, ही बाब लक्षात घेऊन सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्यांवर महापालिकेद्वारे २०० रुपये एवढा दंड आकारण्यात येत आहे. गेल्या ९ महिन्यांमध्ये १९ हजारांपेक्षा अधिक व्यक्तींकडून सार्वजनिक ठिकाणी थुंकल्याबद्दल तब्बल रुपये ३९ लाख १३ हजार १०० इतकी दंड वसुली करण्यात आली आहे, अशी माहिती उपआयुक्त (डॉ.) संगीता हसनाळे यांनी दिली आहे.
याबाबत एका जनहित याचिकेच्या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाद्वारे देण्यात आलेल्या आदेशांनुसार ही कारवाई अधिक ...पान २ वर...

## भाईंदर रेल्वे स्टेशन परिसरात चालणा या वेश्याव्यसायावर कारवाई करून ०३ पीडित मुलीची सुटका - अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष भाईदर पथकास यश




अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध शाखेचे वपोनि श्री. एस.एस.पाटील यांना भाईंदर रेल्वे स्टेशन बंदरवाडी नाका येथे एक महिला वेश्यादलाल नेहा हि पुरुष गिऱ्हाईकांना वेश्यागमनाच्या बांद्रा हि वेश्यागमनाच्या मोबदल्यात मुली पुरवीत असे हि बातमी मिळाल्याने सदर ठिकाणी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना पाठवून छापा टाकला असता नेहा रेहमान वय : ३१ रा. ...पान २ वर...

## धक्कादायक! फेसबुक फ्रेंड झालेल्या महिलेकडून बदनामी



इंदापूर, फेसबुकवर मित्र झालेल्या एका अनोळखी महिलेने ब्लॅकमेल करण्याच्या उद्देशाने एडिट केलेला खोटा नग्न फोटो फेसबुक मेसेंजरद्वारे मित्राला पाठवून बदनाम करण्याचा धक्कादायक प्रकार इंदापूर शहरातील एका युवकासोबत घडला. दीप्ती शर्मा (फेसबुक अकाउंटवरील नाव) या अनोळखी महिलेविरोधात कायदेशीर ...पान २ वर...

# पार्किंगच्या वादातून व्यापाऱ्याला बेदम मारहाण; पाच आरोपींना अटक

उल्हासनगर, उल्हासनगर शहरातील कॅम्प नंबर दोन येथील फर्निचर मार्केटमध्ये माल उतरवण्यासाठी आलेला टेम्पो उभा करण्याच्या वादातून दोन गटांत झालेल्या हाणामारीत एक व्यापारी गंभीर जखमी झाला. हा सर्व प्रकार सीसीटीव्हीत कैद झाला आहे. याप्रकरणी उल्हासनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करत पाच आरोपींना अटक करण्यात आली. उल्हासनगर शहरातील कॅम्प नंबर दोन, तीन या अतिशय वर्दळीच्या आणि शहरातील बाजारपेठांचे केंद्र असलेल्या भागात दुचाकी आणि मालवाहतूक करणारी वाहने उभी करण्यावरून व्यापारी आणि नागरिकांमध्ये वारंवार वाद-विवाद आणि हाणामारीचे प्रकार समोर येण्याचे प्रमाण वाढले आहेत. अशाच प्रकारे दोन दुकानांच्या मध्यभागी असलेल्या एका अरुंद रस्त्यावर माल उतरवण्यासाठी टेम्पो उभा केल्याने उद्भवलेल्या वादातून एका व्यापाऱ्याला पाच जणांनी बेदम मारहाण केल्याचा प्रकार समोर आला. कॅम्प दोन भागातील बजाज शॉपिंग सेंटरसमोर असलेल्या शंकर फर्निचर या अजय माखिजा याच्या दुकानात मंगळवारी माल उतरवण्यासाठी एक टेम्पो आला होता. परंतु माखिजा यांच्या दुकानापर्यंत जाणारा रस्ता अरुंद




असल्याने हा टेम्पो बाहेर रस्त्यात एका बाजूला उभ्या करण्यात आला. या गोष्टीचा राग आल्याने याच भागातील दुसरे व्यापारी दर्शनसिंग सरोज यांनी टेम्पोच्या चाकाची हवा काढली. याचा जाब विजय आणि अजय माखिजा यांनी दर्शनसिंग यांना विचारला असता वाद सुरू झाला. त्याचे रूपांतर थेट धक्काबुक्की आणि हाणामारीत झाले. दर्शनसिंग सरोज, यांच्यासोबत असलेले त्यांचे साथीदार जगतारसिंग सरोज, फतेपालसिंग सरोज, गुरुमुखसिंग आणि सुरजितसिंग यांनी विजय आणि अजय यांना लाकडी फळीने बेदम मारहाण केली. फतेपालसिंग याने लोखंडी रॉडने आणि गुरुमुखसिंग याने लोखंडी पाइपने अजय माखिजा यांच्या डोक्यात प्रहार केला. यानंतर सर्व आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला. अजय यांना तत्काळ उपचारासाठी उल्हासनगर रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु प्रकृती गंभीर असल्याने त्यांना मुंबई येथील एका खासगी रुग्णालयात हलवण्यात आले. मारहाणीचा सर्व प्रकार एका सीसीटीव्हीत कैद झाला. याप्रकरणी मध्यवर्ती पोलिस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा करत सर्व आरोपींना अटक करण्यात आल्याची माहिती सहाय्यक पोलिस आयुक्त टी. टेले यांनी दिली.

# पुण्यात गुटखाविक्रेत्यांची पुन्हा झाडाझडती; शहरात 30 ठिकाणी छापे

पुणे, शहर पोलिसांनी वर्षभरानंतर गुटखाविक्री करणाऱ्या व्यावसायिकांच्या विरोधात शनिवारी पहाटेपासून जोरदार मोहीम राबवली. येरवडा, विमानतळ, चंदननगरसह शहराच्या विविध भागातील पान टपरी, किराणा दुकानदार यांच्यावर ३० ठिकाणी छापे टाकून ३९ लाख रुपयांचा गुटखा जप्त केला आहे. या प्रकरणी २९ जणांवर गुन्हा दाखल करून पाच खटले भरण्यात आले आहेत.
पोलिसांनी गेल्या वर्षी कनार्टक, दीव-दमण या ठिकाणी छापे घालून गुटखा उत्पादकांच्या मुसक्या आवळण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, या कारवाईनंतर अचानक पुणे पोलिसांची गुटखाविक्री विरोधातील कारवाई थंडावली होती. त्याच वेळी मुंबईमध्ये गुटख्यातून होणारी हप्तेवसुली अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) रडारवर आल्यानंतर पुण्यात गेल्या वर्षापासून गुटखाविक्रीबाबत कोणतीही कारवाई झाली नव्हती. त्यानंतर वर्षभरानंतरच अचानक स्थानिक पोलिसांनी पानटपरी तसेच किराणा व्यावसायिकांवर गुटखा विक्रीप्रकरणी कारवाई केली.शहरातील टपऱ्या आणि किराणा मालाच्या दुकानामध्ये



गुटखाविक्री होत असून, मोठा साठा करून ठेवला असल्याची माहिती पोलिस आयुक्त अमिताभ गुप्ता यांना मिळाली होती. त्यानुसार आयुक्तांनी गुटखाविक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार झोन चारचे पोलिस उपायुक्त पंकज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहा पोलिस निरीक्षक, सहा सहायक निरीक्षक, २३ उपनिरीक्षक, ६० कर्मचारी यांची पाच पथके तयार करण्यात आली. त्यानुसार येरवडा, विमानतळ आणि अन्य भागांत टपरी आणि किराणा दुकानांवर तीस छापे टाकण्यात आले. त्या वेळी त्या ठिकाणी प्रतिबंधित गुटखाविक्री केला जात असल्याचे आढळून आले. त्यानुसार पोलिसांनी कारवाई करून ३९ लाखांचा गुटखा जप्त केला आहे. याप्रकरणी संबंधित स्थानिक पोलिस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
'त्या' अधिकाऱ्याचा पदभार काढला गुटखाविक्रीचे रॅकेट उघडकीला आणून थेट गुटख्याच्या कारखान्यापर्यंत पोहोचणाऱ्या पोलिसांच्या कारवाया अचानक थंड झाल्या होत्या. या कारवायांदरम्यान कथित गैरप्रकार झाल्याच्याही तक्रारी वाढल्या होत्या. पोलिस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांच्या आदेशान्वये या प्रकरणी खातेनिहाय चौकशीही सुरू करण्यात आली होती. पुणे पोलिसांकडून गेल्या वर्षी करण्यात आलेल्या कारवायांमुळे दिल्ली, दीव-दमण तसेच कर्नाटकमध्येही खळबळ उडाली होती. या संदर्भात नुकताच या अधिकाऱ्याकडील पदभार काढण्यात आला असून, त्यांना प्रशासकीय जबाबदारी देण्यात आल्यामुळे आयुक्तालयात खमंग चर्चा सुरू झाली आहे.

# लाच घेताना तलाठ्यासह दोघांना अटक



मनमाड, सातबारा उताऱ्यावर नाव लावण्यासाठी ५० हजार रुपयांची लाच घेताना नांदगाव तहसील कार्यालयातील लिपिक व त्याच्या साथीदारास नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने गुरुवारी रात्री रंगेहाथ पकडले. या प्रकरणी नांदगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. सातबारा उताऱ्यावर आजोबांचे नाव लावण्यासाठी यासाठी नांदगांव तहसीलमधील लिपिक समाधान निंबा पवार यांनी साथीदाराच्या मदतीने ५० हजार रुपयांची लाच मागितल्याची तक्रार सिन्नर येथील तक्रारदाराने नाशिक लाचलुचपत विभागाकडे केली होती. तक्रारीबाबत खात्री पटल्यानंतर पथकाने सापळा रचून गुरुवारी रात्री समाधान पवार व नितीन सोनवणे (रा. होलारवाडा, नांदगाव) यांना अटक केली. महिन्यात दुसरी कारवाई नांदगाव महसूल विभागातील ही एका महिन्यातील दुसरी कारवाई आहे. यापूर्वी तलाठी विलास बागुल यांना सहाशे रुपयांची लाच घेताना अटक करण्यात आली होती. तसेच गुरुवारी रात्री पोलिस अधीक्षक सुनील कडासने, नीलेश सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली उप अधीक्षक नरेंद्र पवार, अभिजित पाटील, प्रकाश डोंगरे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# मुंबई-व्यापाऱ्याला फेसबुकवर परदेशी तरुणीची मैत्री पडली महागात; घातला लाखोंचा गंडा




प्रभादेवी येथील एका व्यापाऱ्याला फेसबुकवरून मैत्रीच्या जाळ्यात ओढून त्याला साडेनऊ लाखांचा गंडा घालण्यात आल्याचा प्रकार उघड झाला आहे. त्या व्यापाऱ्याच्या तक्रारीवरून दादर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. प्रभादेवी येथील ड्रायफ्रूटचे व्यापारी चैतन्य (बदललेले नाव) यांना फेसबुकवर जॉय गुंटूर नावाने एका तरुणीची फ्रेंड रिक्वेस्ट आली. चैतन्यने रिक्वेस्ट स्वीकारली. जॉय हिने चैतन्यकडून त्याचा मोबाइल क्रमांक घेतला. दोघेही एकमेकांशी चॅटिंग करू लागले. लंडनमध्ये माझा सलूनचा व्यवसाय असून भारतामध्ये खरेदी करण्यासाठी येण्याची इच्छा आहे. तसेच मालमत्तादेखील घ्यायची आहे. यासाठी तुझी मदत लागेल, असे जॉय सांगू लागली. दोनच दिवसांनी जॉयने लंडन ते भारत असे विमानाचे तिकीट चैतन्यला व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून पाठविले. त्यानंतर पुन्हा काही दिवसांनी जॉयने चैतन्यला फोन करून, आपण नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरल्याचे सांगितले. माझ्याकडे ७५ हजार डॉलर असल्याने ते सोडविण्यासाठी २४ हजार ८०० रुपये पाठव, असा संदेश तिने पाठविला. त्यानुसार तिने पाठविलेल्या बँक खात्यावर चैतन्यने रक्कम पाठवली.
काही वेळाने एका महिला कस्टम अधिकाऱ्याचा चैतन्यला फोन आला. तुमच्या मैत्रिणीला आम्ही ताब्यात घेतले असून तिला सोडविण्यासाठी सुरक्षा ठेव म्हणून १ लाख रुपये भरावे लागतील, असे सांगितले. चैतन्यने ही रक्कमदेखील पाठवली. त्यानंतर इंटरनशनल मॉनिटरी फंड सर्टीफिकेट, फायनान्शिअल कन्डक्ट सर्टिफिकेट, पोलिस पडताळणी अशी वेगवेगळी कारणे सांगून कस्टम अधिकाऱ्यांनी चैतन्यकडून ९ लाख ४५ हजार रुपये उकळले. कस्टम अधिकाऱ्यांची पैशाची मागणी थांबत नसल्याने आपली फसवणूक होत असल्याचे त्याच्या लक्षात आले.

# औरंगाबादेत भरदिवसा दुचाकीस्वार चोरांनी हिसकावले वृद्ध महिलेचे मंगळसुत्र



औरंगाबाद, उल्कानगरीतील श्रीनगरातून महिलेला पत्ता विचारण्याच्या बहाण्याने दोन तोळ्यांचे मंगळसूत्र हिसकावल्याची घटना ताजी असतानाच सिडकोच्या एन-९ जे सेक्टरमधून भरदिवसा दुचाकीस्वार चोरांनी वृद्ध महिलेचे चार तोळ्याचे मंगळसूत्र हिसकावले. महिलेने सतर्कता दाखवत पोत हातात धरल्याने चोरट्याच्या हाती सूमारे एक ते सव्वा तोळे सोने हाती लागले. दरम्यान, मंगळसूत्र चोरीच्या घटना रोखण्यासाठी ठोस उपाययोजना हाती घेण्यात आले असून काही गुन्हे उघड झाले असून अन्य आरोपीही लवकरच गजाआड होतील, असे पोलिस आयुक्त डॉ. निखिल गुप्ता यांनी सांगितले. शहरात वटसावित्री पौर्णिमेला तीन महिलांचे मंगळसूत्र चोरीला गेले होते. तेव्हापासून घटना सातत्याने घडत आहेत. दरम्यान, गुन्हे शाखा आणि सिडको पोलिसांनी मंगळसूत्र चोरांच्या मुसक्या आवळल्या. तरीही चोरीचे सत्र अद्यापही सुरूच आहे. शुक्रवारी दुपारी साडेतीन वाजेच्या सूमारास फिर्यादी शोभा सुभाषचंद्र पांडे ( वय ६४, रा. हडको एन-९, श्रीकृष्ण नगर) या महाराष्ट्र बँकेत पेन्शनचे पैसे आणण्यासाठी गेल्या होत्या. दरम्यान, बँकेतून घराकडे ते पायी येत होत्या. रंजनवन एम टू रोडसमोरील एम ९ जे सेक्टर येथील एका अंतर्गत रस्त्याने येत होत्या. रस्त्यावर फारशी वर्दळ नव्हती. त्याच वेळी फिर्यादीला दुचाकीस्वार दोघांनी थांबवले. त्यातील एकाने पत्ता विचारण्याच्या बहाणा केला आणि संधी साधत गळ्यातील मंगळसूत्र हिसकावण्याच्या प्रयत्न केला. तेव्हा फिर्यादी शोभा यांनी मंगळसूत्र घट्ट धरून ठेवले. त्यामुळे सात ते आठ ग्रॅमचीच सोनसाखळी चोरट्यांच्या हाती लागली.
तेवढीच सोनसाखळी घेऊन चोरट्यांनी तेथून धूम ठोकली. शोभा यांनी आरडाओरड केली. मात्र, तोपर्यंत चोरटे पसार झाले. घटनेची माहिती मिळताच सिडको पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. याप्रकरणी सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले असून आरोपीच्या शोधार्थ पथके तैनात करण्यात आले आहे. दरम्यान, पोलिस आयुक्त डॉ. निखिल गुप्ता यांनी तातडीने सिडको पोलिस ठाण्यात बैठक घेत अधिकाऱ्यांना सूचना केल्या. पोलिस उपायुक्त दीपक गिर्हे, गुन्हे शाखेचे सहायक आयुक्त रवींद्र साळोखे, वाहतूक शाखेचे सहायक आयुक्त सुरेश वानखेडे, सिडको ठाण्याचे निरीक्षक अशोक गिरी, मधुकर सावंत यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

# पुण्याचा आव्हाळवाडीत कामगाराचा दगडाने ठेचून खून;परिसरात खळबळ



येरवडा, चाळीस वर्षीय कामगाराचा दगडाने ठेचून खून करण्यात आला. ही घटना वाघोलीजवळील आव्हाळवाडी परिसरातील शेतामध्ये बुधवारी सायंकाळी उघडकीस आली. या प्रकरणी लोणीकंद पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विष्णु सुनील दास (वय ४०, रा. गणेशनगर, वाघोली) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आव्हाळवाडी येथील गट नंबर ४४९ मध्ये राजेश घुले यांच्या शेतात एका ४० वर्षीय व्यक्तीचा मृतदेह सापडल्याची माहिती लोणीकंद पोलिसांना मिळाली. घटनास्थळी पाहणी आणि सखोल चौकशी केल्यावर मृतदेहाची ओळख पटली. दास हे पत्नीसोबत वाघोली येथील गणेशनगर परिसरात वास्तव्यास होते. दोघेही बांधकाम मजूर म्हणून काम करतात. मंगळवारी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास दास बाजारात गेले होते. त्यावेळी त्यांचा काही लोकांसमवेत वाद झाल्याचे समजते. या दृष्टीने पोलिस तपास करत आहेत. मंगळवारी सुट्टीच्या दिवशी दास आणि त्यांचा मित्र शेतात दारू प्यायल्यानंतर वाद होऊन मित्राने दगडाने ठेचून खून केल्याची शक्यता आहे. पोलिसांकडून आरोपीचा शोध चालू आहे. अद्याप कोणालाही अटक केलेली नाही.

## पृष्ठ १ वरुन

### नियमांचे उल्लंघन करत गोवंडीत अबू

आयोजन करून काही राजकीय नेतेच हे नियम पायदळी तुडवत आहेत. रविवारी शिवाजी नगर-मानखुर्द विधानसभा आमदार अबू असीम आझमी यांचा वाढदिवस होता. यावेळी कार्यकर्त्यांनी घोडा गाडीतून या परिसरात मिरवणूक काढली. त्यात अबू आझमीही सामील होते. यावेळी मिरवणुकीत शेकडो जण सहभागी झाले होते. याठिकाणी पोलिसांचा मोठा फौजफाटा असतानाही त्यांच्यासमोर करोना नियमांचे सर्रास उल्लंघन होत होते. तर कार्यकर्त्यांनी भेट दिलेली तलवार देखील आझमी यांनी भर रस्त्यात हवेत फिरवली. सुमारे पाचशे ते हजार जण या मिरवणुकीत सहभागी झाल्याने या ठिकाणी सामाजिक अंतराचे तीन तेरा वाजले होते. याबाबत आवश्यक कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याची माहिती शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक किशोर गायके यांनी दिली.

### मोबाइल चोरणाऱ्यांची

मोबदल्यात पुरुष गिऱ्हाईकाकडून पैसे स्वीकारून मुली पुरवीत असताना आढळून आली असता आरोपी ला रक्कमेसह ताब्यात घेऊन ०३ मुलींची सुटका केली. सदर बाबत महिला वेश्यादलाल नेहा हिच्याविरुद्ध नवघर पोलीस ठाणे येथे पो.हवा विजय विनायक ढेमरे यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरून नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
सदरची कामगिरी डॉ.श्री. महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे) , श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष भाईंदर विभागाचे वपोनि श्री. संपतराव पाटील. पोहवा विजय ढमरे, पोचवा. रामचंद्र पाटील, मपोना. यंबर , मपोना .कमल चव्हाण , पो. शि . केशव शिंदे, चालक पोना. गावडे यांनी केली आहे.

### पोलिसांवर जीवघेणा हल्ला करणाऱ्या 02

आरोपी यांचा शोध घेतला आरोपी नाव : ०१)सोमेश नवनाथ म्हात्रे वय : २५ रा. डोंबिवली पश्चिम २ ) साहिल श्रीनिवास ठाकूर उर्फ वालट्या वय 22 रा. डोंबिवली पश्चिम यांना मोठागाव ,शंकर मंदिराच्या मागे,रेतीबंदर रोड येथे पकडुन दिनांक ०५/०८/२०२१ रोजी अटक करण्यात आली. सदरची कामगिरी मा.सहायक पोलीस आयुक्त,सो.डोंबिवली विभाग, डोंबिवली श्री.जयराम मोरे सो. डोंबिवली विभाग व मा. वरिष्ठ पोलिस निरिक्षक श्री. संजय साबळे यांचेमार्गदर्शनाखाली सपोनि. जी.आर. वडणे, पोहवा. एस. एन. नाईकरे, पोना.एस.के.कुरणे, पोना.बी.के.सांगळे,पोशि.के.अे.भामरे, पोशि.एम.एस.बडगुजर,यांनी सदरची कारवाई यशस्वीपणे पार पाडली आहे.

### मुंबई महापालिकेची कडक कारवाई

तीव्र करण्यासोबतच प्रभावी जनजागृती करण्याचे आदेश देखील देण्यात आले आहेत. तरी नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी थुंकू नये, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक ठिकाणी वावरताना आवर्जून मुखपट्टी (मास्क) वापरावी, वारंवार हात धुवावेत किंवा सॅनिटाईज करावेत आणि दोन व्यक्तींमध्ये सुरक्षित अंतर राखावे, असे आवाहन पुन्हा एकदा महापालिका प्रशासनाद्वारे करण्यात येत आहे.
याअंतर्गत सर्वाधिक दंड वसुली 'ए' विभागात प्रामुख्याने फोर्ट, कुलाबा इत्यादी परिसरांत करण्यात आली आहे. या ठिकाणी सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्या नागरिकांकडून ६ लाख १५ हजार ८०० रुपये इतकी दंडवसुली करण्यात आली आहे. या खालोखाल प्रामुख्याने कुर्ला परिसराचा समावेश असलेल्या 'एल' विभागातून ६ लाख १२ हजार २०० रुपये तर 'सी' विभागातून ४ लाख ५२ हजार २०० इतकी दंड वसुली करण्यात आली आहे.

### र7ाज्यातील चारही

ठोस पावले उचलली जात आहेत. आरोग्य संचालक डॉ. साधना तायडे या सातत्याने पाठपुरावा करत असून दोन दिवसांपूर्वी सहसंचालक डॉ. पद्मजा जोगेवार यांनी संबंधितांची बैठक घेऊन बांधकामाच्या दृष्टीने आवश्यक ते प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. याबाबत डॉ. जोगेवार यांना विचारले असता 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ व न्यूरो सायन्सेस' च्या मार्गदर्शक तत्वांनुसार रुग्णालयांची उभारणी केली जाणार असल्याचे सांगितले. तसेच याबाबत प्राथमिक तयारी करून अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. प्रदीप व्यास यांच्या अध्यक्षतेखाली सविस्तर बैठक होऊन अंतिम स्वरुप दिले जाईल असे सांगितले. पुढच्या ५० वर्षांची मानसिक आरोग्याची गरज लक्षात घेऊनच मनोरुग्णालयांचे बांधकाम केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. आरोग्य विभागाची सर्व मनोरुग्णालये ही १०० वर्षांपूर्वी बांधण्यात आली असून त्यातील अनेक इमारती या देखभाल व डागडुजीपलीकडे गेल्या होत्या. खासकरून ठाणे मनोरुग्णालयात सध्या १००० मनोरुग्ण दाखल असताना येथील पुरुष मनोरुग्णांच्या १४ इमारतींपैकी ७ इमारती धोकादायक आहेत तर महिलांच्या १५ इमारतींपैकी १० इमारती धोकादायक बनल्याने अन्य इमारतींमध्ये येथील मनोरुग्णांचे स्थालांतर करण्यात आले आहे. करोनाकाळात येथील अनेक रुग्णांना करोना झाल्यामुळे आयसोलेशन वॉर्ड म्हणजे स्वतंत्र मोकळा विभाग निर्माण करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

### धक्कादायक! फेसबुक फ्रेंड झालेल्या

कारवाई करण्यात यावी, अशी मागणी संबंधित युवकाने इंदापूर पोलिस ठाण्यात केली आहे. इंदापूर शहरात 'जेसीबी'चा व्यवसाय करणाऱ्या एका युवकाच्या फेसबुक खात्यावरून मोबाइल क्रमांक मिळवून दीप्ती शर्मा या महिलेने संबंधित युवकास मंगळवारी (३ ऑगस्ट) सकाळी व्हिडिओ कॉल केला. त्यावरील महिलेचे अश्लील चाळे पाहून संबंधित युवकाने अवघ्या १५ सेकंदांत हा कॉल कट केला. मात्र, महिलेने या कॉलदरम्यान युवकाचा फोटो घेऊन तो एडिट करून खोटा नग्न फोटो तयार करून तो बुधवारी (४ ऑगस्ट) त्यांच्या एका मित्राच्या 'फेसबुक मेसेंजर'वर पाठवला.

### १५ ऑगस्टपासून लोकल प्रवासमुभा!

लागत आहे. अशा उचापतखोरांच्या दबावाला बळी पडू नका, असे आवाहन करीत मुख्यमंत्र्यांनी भाजपला टोला लगावला. कोकण व पश्चिम महाराष्ट्र चिंताजनक अतिवृष्टी आणि पुराचा फटका बसलेल्या रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, सांगली आणि कोल्हापूर या जिल्ह्यांमध्ये करोना रुग्णसंख्या अद्यापही कमी झालेली नाही. दैनंदिन रुग्णसंख्या या जिल्ह्यांमध्ये जास्त आहे. याशिवाय पुणे, नगर, बीड, सोलापूरमध्येही परिस्थिती चिंता करण्यासारखी आहे. या जिल्ह्यांमध्ये निंबध लगेच शिथिल के ले जाणार नाहीत, असे ठाकरे यांनी स्पष्ट के ले. राज्यात पुन्हा रुग्णसंख्या वाढल्यास निंबध लागू करावे लागतील, असा इशारा देत मुख्यमंत्र्यांनी सर्वांनी खबरदारी घेण्याचे आवाहन के ले. के रळमध्ये रुग्ण वाढत आहेत. अमेरिका, तसेच अन्य देशांमध्येही दैनंदिन रुग्णसंख्या वाढतच आहे. या पाश्र्वभूमीवर आपल्याला खबरदारी घ्यावी लागेल. राज्यात आतापर्यंत ४ कोटी ६३ लाख ७६ हजार लसमात्रा देण्यात आल्या. यामध्ये पहिली मात्रा घेतलेल्या नागरिकांची संख्या ३ कोटी ४५ लाख ३० हजार ७१९ तर दोन्ही मात्रा घेतलेल्या नागरिकांची संख्या १ कोटी १८ लाख ४६ हजार १०७ आहे. लसीकरण वाढत असले तरी एका टप्पापर्यंत लसीकरण होत नाही तोवर निंबध पाळावेच लागतील, असेही ठाकरे यांनी स्पष्ट के ले. त्यासाठी करोनामुक्त गावासारखी संकल्पना राबविली जात असून अनेकांनी या दिशेने योग्य पाऊले टाकायला सुरुवातही केली आहे. उद्योजक, कंपन्यांनी आपल्या कामाच्या वेळा बदलून शिफ्टमध्ये कामगारांना बोलवावे, शक्य असलेल्या कंपन्यांनी त्यांच्या कामगारांची राहण्याची सोय त्यांच्या संकुलात करावी, अशी विनंतीही त्यांनी यावेळी के ली. तिसऱ्या लाटेसाठी सज्जता करोनाच्या पहिल्या लाटेत २० लाख, दुसऱ्या लाटेत ४० लाख लोक बाधित झाले असून, तिसऱ्या लाटेत ६० लाख लोक बाधित होण्याची भीती वर्तवण्यात येत असल्याचे नमूद करताना मुख्यमंत्र्यांनी त्यादृष्टीने सरकार सज्ज असल्याचे सांगितले. या संभाव्य तिसऱ्या लाटेचा सामना करण्यासाठी चाचणी प्रयोगशाळांची संख्या आता ६०० वर गेल्याचे, विलगीकरण रुग्णशय्यांची संख्या ४.५ लाखांहून अधिक केल्याची माहिती त्यांनी दिली.

पोलीस बातमी पत्र
महामुंबई
मुंबई, मंगळवार ०३ ते ०९ ऑगस्ट २०२१


संपादकीय...



## ऑलिम्पिकमध्ये उगवतीची सोनेरी पहाट

७ ऑगस्ट २०२१ हा दिवस भारतीय क्रीडा इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला गेला. नीरज चोप्रा याने टोकियोत ऑलिम्पिकच्या मूळ मैदानी खेळांपैकी एक, भालाफेकीचे सुवर्णपदक जिंकले. अथेन्स येथील १८९६च्या आधुनिक ऑलिम्पिकनंतर सव्वाशे वर्षांत भारताचे हे ॲथलेटिक्सचे पहिले पदक. मिल्खा सिंग, पी.टी. उषा वगैरे दिग्गजांना त्याने हुलकावणी दिली होती. १९०० च्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ब्रिटिश इंडियाकडून खेळलेले नॉर्मन पिचार्ड यांची दोन रौप्यपदके आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक महासंघ इंग्लंडची मानतो. नेमबाज अभिनव बिंद्रानंतर वैयक्तिक सुवर्णपदक जिंकणारा नीरज दुसराच. याशिवाय भारताला मिळाली ती आठही सुवर्णपदके सांघिक, हॉकीची. आठ वर्षांपूर्वीचा लंडन ऑलिम्पिकमधील सहा पदकांचा विक्रम टोकियोत मोडला गेला. चार दशकांनंतर हॉकीचे कांस्य व नीरजचे सुवर्णपदक हा ऐतिहासिक यशाचा कळस. मीराबाई चानू व रवीकुमार दहिया यांची रौप्यपदके आणि पी. व्ही. सिंधू, लवलीना बोरगोहेन, बजरंग पुनिया यांची कांस्यपदके अशी टोकियोची एकूण कमाई सात पदकांची. भारताची ही आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी.टोकियोत भारतीयांनी सोनेरी युगाची पहाट अनुभवली.

अमेरिका, चीन, जपान, इंग्लंड वगैरेच्या तुलनेत ही कामगिरी किरकोळ, तरी भारतीय खेळाडूंचे हे यश उद्याच्या अनेक पिढ्यांना प्रेरणा देणारे आहे. गरिबी, निरक्षरता, कुपोषण, अनारोग्य वगैरे मूलभूत समस्यांचा सामना करणाऱ्या भारतात केवळ लोकसंख्या प्रचंड आहे म्हणून जगज्जेते खेळाडू तयार होतील, असे नाही. मूलभूत प्रश्न आधी सोडविणे महत्त्वाचे. अशीच प्रचंड लोकसंख्या असलेला चीनदेखील गरिबीच्या दलदलीतून बाहेर पडल्यानंतरच क्रीडा महासत्ता बनू शकला. पदकतालिकेतील वरच्या देशांशी भारताची तुलना शक्य नाही. आर्थिक संपन्नता व शारीरिक क्षमतांची जनुकीय वैशिष्ट्ये यांची सांगड घातली जाते तेच देश जागतिक स्पर्धांमध्ये पदकांची लयलूट करतात. आफ्रिकन, मंगोलियन, युरोपियन खेळाडूंच्या क्षमतांपुढे दक्षिण आशियातील खेळाडू कमी पडतात. तरीदेखील आर्थिक महासत्ता बनू पाहणारा भारत क्रीडा विश्वगुरू का बनू शकत नाही, हा प्रत्येकाला भेडसावणारा प्रश्न आहे.एकतर क्रिकेट हा देशाच्या क्रीडा विकासात मोठा अडथळा आहे. इतर खेळांचा पैसा, प्रतिष्ठा, प्रसिद्धी, वलय सारे काही क्रिकेटने बळकावले आहे. पंधरा दिवस ऑलिम्पिकची चर्चा झाली तेवढेच. मॅच फिक्सिंगसारखी कीड लागल्यानंतरही क्रिकेटचा बाजार थांबला नाही. क्रिकेटची मैदाने व स्टेडियमवर जितका खर्च केला त्याच्या चौथा हिस्सा जरी अन्य खेळांवर केला असता तर आतापर्यंत डझनांनी ऑलिम्पिक पदके आली असती.

महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, दिल्ली आदी प्रगत, संपन्न राज्यांचे क्रिकेटशिवाय अन्य खेळांकडे अजिबात लक्ष नाही. क्रिकेटसह देशातील प्रत्येक खेळ, नव्हे प्रत्येक कृतीत नको तितके राजकारण घुसले आहे. प्रत्येक गोष्ट राजकीय चष्म्यातून पाहिली जाते. खेळाडूंच्या मेहनतीचे फुकट श्रेय घेणारे राजकारणी व त्यांना ते देऊ पाहणारे नागरिक दोन्हीही याला जबाबदार आहेत. याशिवाय, सगळ्याच जागतिक स्पर्धांमधील यशस्वी खेळाडूंचे वय खूप महत्त्वाचे असते. कॅच देम यंग किंवा अगदी चार-सहा वर्षे वयाचे उगवते खेळाडू शोधणे व त्यांना जागतिक स्पर्धेसाठी तयार करणे ही प्रक्रिया भारतात जवळपास नाहीच. शालेय स्पर्धा औपचारिकता म्हणून पार पडतात. टोकियोतल्या यशाला खेलो इंडिया स्पर्धेचा फायदा झाला; पण हा अपवाद आहे. तिसरे कारण खेळांच्या पायाभूत सुविधांचा अभाव.

सरकार, बडे उद्योग, अन्य संस्थांनी एकत्र येऊन या सुविधा दिल्या तरच चॅम्पियन्स घडतील.

तसे होत नसल्याने ऑलिम्पिक पदकविजेत्यांची संख्या एका किंवा दोन हातांच्या बोटांवर मोजावी लागते.सरकारी यंत्रणा भ्रष्ट आहे. तेव्हा उद्योजकांनी समोर यायला हवे. नीरज चोप्राला जिंदाल समूहाने बळ दिले. इतरही उद्योग अशी मदत करतात. पण, ती वाढायला हवी. महत्त्वाचे म्हणजे खेळाडूंना भव्यदिव्य, जग जिंकण्याची स्वप्ने पडायला हवीत. ती सत्यात उतरविण्यासाठी अहोरात्र कष्ट उपसायची तयारी हवी.

ईशान्य भारतातील खेळाडूंचा आदर्श या बाबतीत घ्यायला हवा. रडगाणे गाण्याऐवजी प्रतिकूलतेवर मात करण्याची जिद्द हवी. इतिहास घडविणारा नीरज चोप्रा चौदाव्या वर्षी घरातून बाहेर पडतो. भाल्याला सर्वस्व वाहून घेतो. ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकल्यानंतरही त्याची भूक शमलेली नसते.

यशाच्या शिखरावर असतानाही त्याला जागतिक विक्रम खुणावतो. ही अशी जिद्द अंगात असेल तरच कष्टाला, स्वप्नांना सोनेरी भाले फुटतात व सन्मानांची माळ गळ्यात पडते.

# कानउघाडणीनंतरही कोडगेच?

## इंग्लंडच्या पोलीस दलाशी तुलना होणाऱ्या या खात्यांनी नेमक्या याच प्रकरणात लक्ष न घालण्याचे कारण अस्पष्ट आहे

मुंबईत २००२ मध्ये झालेल्या बेस्ट बस बॉम्बस्फोटासंदर्भात पकडलेल्या आणि पोलिसांच्या ताब्यात असताना २००३ पासून 'बेपत्ता किंवा मृत' झालेल्या ख्वाजा युनुस प्रकरणात राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (सीआयडी) अक्षम्य कुचराई करत असल्याचा ठपका मुंबईतील सत्र न्यायालयाने ठेवला असतानाच, सर्वोच्च न्यायालयानेही केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) आणि राज्यांमधील पोलीस यंत्रणा तसेच गुप्तचर विभाग यांच्यावर तशाच आशयाची कडक टीका केली आहे. या देशात गुन्ह्यांच्या तपासात होणारा दीर्घ विलंब ही केवळ वेदनादायक गोष्ट नसून लाजिरवाणी अधिक आहे, असाच याचा अर्थ. देशातील उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायमूर्तींनी नियमित तक्रारी केल्यानंतरही त्याची कोणतीही गंभीर दखल घेतली जात नसल्याचे मत सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांनी व्यक्त केले आहे. उच्च पदांवरील आणि समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींविरुद्धच्या प्रकरणांमध्ये न्यायाधीशांना व्यक्तिगत पातळीवर आणि समाजमाध्यमांतून शारीरिक इजा करण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत, त्यांचा मानसिक छळही केला जात आहे. त्याबाबत केंद्रीय अन्वेषण विभागाकडे तक्रारींवर तक्रारी करूनही त्याबाबत गांभीर्याने तपास केला जात नाही, ही खेदजनक बाब असल्याचे सरन्यायाधीशांनी म्हटले आहे. हा विभाग म्हणजे पिंजऱ्यातील पोपट आहे, अशी टीका यापूर्वीही (मे २०१३) सर्वोच्च न्यायालयाने केली होती. त्याचा कोणताच परिणाम या विभागावर झालेला दिसत नाही. न्यायाधीशांच्या तक्रारींकडेही दुर्लक्ष करण्याएवढा निर्ढावलेपणा या विभागांमध्ये दिसत असल्याची ही टीका तेथील कार्यक्षमतेचे धिंडवडे काढणारी आहे.




ख्वाजा युनुस याच्या मृत्यूविषयीच्या प्रकरणाशी अलीकडेच पुन्हा वादग्रस्त ठरलेले सचिन वाझे यांचा संबंध असल्याचे उघड झाले होते. मात्र पुढे काहीही कारवाई होत नसल्याबद्दल सत्र न्यायाधीशांनी स्पष्ट शब्दांत राज्य गुन्हे अन्वेषण विभागावर ताशेरे ओढले आहेत. अन्य सर्व प्रकरणांतील तपासाचा प्रगती अहवाल सादर करणाऱ्या या विभागाने फक्त या एकाच प्रकरणाबाबत केलेली कुचराई शंकास्पद आहे, असे स्पष्ट करताना उच्च न्यायालयाने दिरंगाईचा तपशीलही दिला आहे. राज्य सरकारने २००९ पासून सुरू असलेल्या या खटल्यात तीन वेळा विशेष सरकारी वकील बदलले. चौथ्या वकिलाची नेमणूक अद्यापही झालेली नाही. तपासात इतकी वर्षे दिरंगाई होत असताना, या स्फोटातील मृत पावलेल्या व्यक्तीची आई न्याय मिळण्याची वाट पाहात आहे, इतक्या स्पष्ट शब्दांत कानउघाडणी केल्यामुळे या विभागाची लक्तरेच टांगली गेली आहेत. राज्यातील गुन्हे अन्वेषण विभाग आणि मुंबई पोलीस यांची देशभरात ख्याती होती. इंग्लंडच्या पोलीस दलाशी तुलना होणाऱ्या या खात्यांनी नेमक्या याच प्रकरणात लक्ष न घालण्याचे कारण अस्पष्ट आहे. या प्रकरणात न्यायालयाने कोणताही स्थगिती आदेश दिलेला नसताना, 'केस डायरी' दाखल करण्याबाबतही दहा वर्षे एवढी दिरंगाई का होत आहे, इतक्या वर्षांनंतर प्रत्यक्षदर्शींना सगळा तपशील जसाच्या तसा कसा आठवता येईल, या न्यायालयाने उपस्थित केलेल्या प्रश्नांवरून दिरंगाईची पाळेमुळे किती खोल गेलेली आहेत, याची कल्पना यावी. 'देर है और अंधेर भी' अशी या तपासाची स्थिती आणि गती.केंद्रात संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार असताना सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय अन्वेषण विभागाची संभावना 'पिंजऱ्यातील पोपट' अशी केली होती. सत्ताधाऱ्यांच्या दावणीला बांधला गेलेला हा विभाग कणाहीन असल्याची टीका आत्ता सत्तेत आलेल्या भारतीय जनता पक्षाने त्या वेळी केली होती. आठ वर्षांनंतरही या विभागाच्या कार्यशैलीत जराही बदल झालेला नाही, हे अगदी अलीकडील काही प्रकरणांवरूनही स्पष्ट झाले आहे. या विभागात नेमले गेलेले कोणते अधिकारी सत्ताधाऱ्यांच्या विशेष मर्जीतील होते आणि या मर्जीधारकांनी आपल्याच वरिष्ठांवरही कारवाई कशी सुरू केली, याच्या सुरस कथा उघडपणे चर्चिल्या गेल्या आणि विरोधी पक्षातील नेत्यांना या विभागाच्या मदतीने जेरीला आणण्याचा खेळही सुरू राहिला. धनबाद येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश उत्तम आनंद यांची ज्या निर्घृण पद्धतीने हत्या झाली, तिचे प्रत्यक्ष चित्रणही उपलब्ध झाले. या प्रकरणी सुनावणी सुरू असताना सरन्यायाधीश रमणा यांनी राज्यांमधील गुन्हे अन्वेषण विभागांना अक्षरश: धारेवर धरले. प्रतिष्ठित व्यक्तींच्या विरोधात निकाल दिला की, न्यायालयांना टीकेचे लक्ष्य करण्याचा नवा प्रवाह आता सुरू झाला आहे, अशी टिप्पणी सरन्यायाधीशांना करावी लागली. गुन्हेगार एसएमएसद्वारे थेट न्यायाधीशांना जिवे मारण्याच्या धमक्या देत असतानाही, गुन्ह्यांचा तपास करणाऱ्या यंत्रणा शांत राहू कशा शकतात, असा प्रश्न जाहीररीत्या विचारावा लागणे ही या खात्यांवरील नामुष्की आहे. त्यांच्या नाकर्तेपणामुळे या देशातील न्याययंत्रणा निर्भयपणे काम करू शकणार नसतील, तर नागरिकांच्या त्यावरील विश्वासालाच तडा जाण्याची भीती आहे. गेल्या काही काळात न्यायालयाने दिलेले निकाल पाहता, न्यायपालिकेवरील विश्वास अधिक दृढ होऊ लागला असताना, न्यायमूर्तींना स्वत:च्या अडचणी सार्वजनिक कराव्या लागण्याइतपत कोडगेपणा केंद्रीय आणि राज्य पातळीवरील तपास यंत्रणांकडे असल्याचे दिसणे, हा त्या यंत्रणांना काळिमाच.

## 'सेल्फी' काढण्याच्या नादात जीव गेला; बोट उलटून एकाचा बुडून मृत्यू



विरार पूर्व नारंगी खाडी येथे बोटीवर वाढदिसाची पार्टी साजरी करताना, सेल्फी काढण्याच्या नादात बोट उलटून एकाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या संदर्भात अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. अर्नाळा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार विरार पश्चिम येथे राहणारे शशिकांत गोविंद गुरव (५४) हे आपल्या मित्राचा वाढदिवस साजरा करण्यासाठी, १० ते १२ मित्रांसह विरार पूर्व नारंगी खाडी परिसरात रविवारी इतर मित्रांबरोबर गेले होते. रेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या नांगरलेल्या बोटीवर त्यांची ही पार्टी सुरू होती. दरम्यान, पार्टी सुरु असताना सेल्फी काढण्यासाठी गुरव आणि त्यांचे मित्र बोटीच्या एका दिशेला गेले असता, बोट अचानक उलटली आणि गुरव व त्यांचे मित्र पाण्यात पडले. पण गुरव यांना पोहता येत नसल्याने ते पाण्यात बुडू लागले. यावेळी त्यांनी मदतीसाठी आरडओरड केली, तेव्हा ग्रामस्थांनी त्यांना बाहेर काढले. त्यांच्यात एका डॉक्टर मित्राने त्याच्या पोटातील पाणी काढून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात नेले, मात्र डॉक्टरांनी तपासून गुरव यांना मृत घोषित केले.या संदर्भात अधिक माहिती देताना अर्नाळा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू माने यांनी माहिती दिली की, हे मित्र नांगरलेल्या बोटीत बसले होते. त्यांनी कोणतीही परवानगी किंवा भाड्याने घेतली नव्हती. या संदर्भात पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद घेतली असून पुढील तपास करत आहेत.

## गणेशोत्सव मंडप परवानगी केवळ 197 मंडळांचे अर्ज

मुंबई : गणेशोत्सवाला अवघा एक महिना राहिला असताना यावर्षी आतापर्यंत मुंबई महापालिकेकडे गणेशोत्सव मंडळांचे के वळ १९७ अर्ज दाखल झाले आहेत.

महापालिकेने गणेशोत्सवाच्या परवानगीसाठी १४ जुलैपासून अर्ज मागवण्यास सुरुवात केली होती. परंतु के वळ १९७ अर्ज पालिकेकडे आले आहेत.



करोनासाथीच्या संकटामुळे गणेशोत्सव मंडळात अद्याप निरुत्साह असल्याचे आढळते. मुंबईत साधारणत: ११ हजार सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आहेत. त्यापैकी जी मंडळे रस्त्यावर मंडप उभारून गणेशोत्सव साजरा करतात अशा मंडळांना पालिकेची परवानगी घ्यावी लागते. अशी साधारण तीन हजार मंडळे दरवर्षी पालिकेकडे परवानग्यांसाठी खेटे घालत असतात. दरवर्षी ही संख्या वाढत जाते. दरवर्षी पालिकेकडे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे अडीच ते पावणे तीन हजार अर्ज येतात. यंदा मात्र परवानग्या सुरू केल्यापासून गेल्या पाऊण महिन्यात १९७ अर्ज दाखल झाले असल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली.यंदाच्या गणेशोत्सवावरही करोनाचे सावट आहे. त्यातच गणेशमूर्तीच्या उंचीची मर्यादा, ऑनलाईन दर्शन, वर्गणी संकलनास मनाई, मोठय़ा जाहिरातींच्या प्रदर्शनावर बंदी अशा निर्बधांमुळे गणेशोत्सव साजरा करणे मंडळांना मुश्कील होऊ लागले आहे.

गेल्यावर्षी अनेक लहान मंडळांनी गणेशोत्सव रद्द के ला होता. त्यामुळे यंदा ही मंडळे पुन्हा गणेशोत्सव साजरा करतील का, याबद्दल साशंकता व्यक्त केली जात आहे.

महापालिकेच्या अटींचा अडथळा?

गेल्यावर्षीच्या परवानगीच्या आधारेच यंदाही गणेश मंडळांना परवानगी दिली जाणार आहे. गेल्यावर्षी ज्यांना परवानगी दिली होती, त्यांना पुन्हा पोलीसांच्या व वाहतूक विभागाच्या परवानग्यांसाठी ताटकळावे लागणार नाही, अशीही सोय यावर्षी करण्यात आली आहे. मात्र त्यासाठी सर्व मंडळांना लेखी हमीपत्र द्यावे लागणार आहे. करोनाचा संसर्ग होऊ नये या दृष्टीने या हमीपत्रात पालिकेने अनेक अटी घातल्या आहेत.

## शुल्करचनेतील हस्तक्षेपास मंत्र्यांचाच विरोध

मुंबई : केवळ अपवादात्मक परिस्थितीत म्हणजे 'आपत्ती व्यवस्थापन कायदा' किंवा 'साथरोग प्रतिबंधक अधिनियम' लागू केल्याने शाळा तीन महिने बंद ठेवाव्या लागल्यास खासगी शाळांच्या शुल्करचनेचे नियमन करण्याचे अधिकार राज्य सरकारला देणाऱ्या मूळ प्रस्तावाला मंत्रिमंडळातील शिक्षणसम्राट मंत्र्यांमुळे बगल द्यावी लागत आहे.करोनामुळे उत्पन्नावर परिणाम झालेल्या पालकांना दिलासा देण्यासाठी खासगी शाळांचे शुल्क १५ टक्क्यांनी कमी करता यावे, यासाठी 'महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियमा'त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या प्रस्तावाला मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार आपत्ती व्यवस्थापन कायदा किंवा साथरोग प्रतिबंधक अधिनियम लागू असल्यास आणि शाळा तीन महिन्यांहून अधिक काळ बंद ठेवाव्या



लागल्यास खासगी शाळांच्या शुल्करचनेचे नियमन करण्याचे अधिकार काममस्वरूपी राज्य सरकारला मिळाले असते. या दृष्टीने विभागाने अध्यादेश काढण्याची तयारी सुरू केली. मात्र अध्यादेशाऐवजी सरकारी आदेश काढून तात्पुरते बदल करण्याचा काही मंत्र्यांचा आग्रह आहे. सरकारी आदेश कायद्याच्या कसोटीवर टिकणारा नसल्याने अध्यादेशाबाबत शालेय शिक्षण विभाग आग्रही आहे. महत्त्वाचे म्हणजे अध्यादेशाच्या पर्यायाला महाधिवक्त्यांनीही काही अटींवर हिरवा कंदील दाखवला आहे. तरीही सरकारी आदेशाबाबत मंत्री आग्रही असल्याने आता हा अध्यादेश २०२१-२२ या शैक्षणिक वर्षापुरता असावा, असा मध्यममार्ग पुढे येत आहे. परंतु, करोनामुळे उद्भवलेली अपवादात्मक परिस्थिती पुढील वर्षीही कायम राहिल्यास शुल्कवाढीची टांगती तलवार कायम राहणार आहे.

मंत्रिमंडळातील जवळपास १७ ते १८ मंत्र्यांच्या स्वत:च्या शाळा-कनिष्ठ महाविद्यालये आहेत. गेल्या वर्षी शुल्क कमी करण्याबाबत सरकारने काढलेल्या सरकारी आदेशाला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात यापैकी काही संस्थाचालक नेत्यांच्याच शाळा आघाडीवर होत्या.

# मृत्यूच्या कारणांची योग्य नोंद होण्यासाठी प्रशिक्षण केंद्र




मुंबई : करोना काळात मृत्यूच्या कारणांची नोंद योग्यरितीने होण्याचे महत्त्व अधोरेखित केले जात आहे. त्या पाश्र्वभूमीवर टाटा स्मारक रुग्णालयाने सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी 'सेंटर फॉर कॉज ऑफ डेथ डेटा' केंद्र सुरू केले आहे. या माध्यमातून मृत्यूंच्या कारणाची नोंद योग्य वैद्यकीय पद्धतीने कशी करावी याचे मार्गदर्शन केले जाणार आहे.

मृत्यूची कारणे निश्चित करून ती मृत्यूच्या प्रमाणपत्रावर योग्यपद्धतीने नोंद करण्याच्या यंत्रणेत सुधारणा करण्याच्या उद्देशाने हा प्रकल्प रुग्णालयाने मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने २०१६ मध्ये तर राज्य सरकारच्या आरोग्य विभागाच्या सहकार्याने २०१८ पासून हाती घेतला आहे. मृत व्यक्तींची तपासणी करून मृत्यूच्या कारणांची नोंद मृत्यू प्रमाणपत्रावर कशी करावी याचे डॉक्टरांना प्रशिक्षिण देण्याची पद्धत 'ब्लूमबर्ग डेटा फॉर हेल्थ इनिशिएटिव्ह'च्या माध्यमातून रुग्णालयाने विकसित केली आहे.

यात राज्याच्या आरोग्य विभागाच्या मदतीने जिल्ह्यंमधील नोंदणी झालेल्या मृत्यूंच्या कारणांची नोंद करण्याचे प्रमाण वाढले असून ते १०० टक्क्य़ांपर्यंत नेले जाणार आहे. केंद्राने ११ मॉड्युलचा प्रशिक्षण आराखडा तयार केला आहे. संसर्गजन्य, असंसर्गजन्य, श्वसनाचे आजार, कर्करोग, शस्त्रक्रिया, स्त्रीरोग आणि नवजात बालकांमधील आजार इत्यादी प्रकारांतील मृत्यूच्या कारणांची नोंद करण्याबाबत माहिती दिली जाईल. गर्भातच मृत्यू होणाऱ्या बालकांच्या नोंदीचाही समावेश यात आहे. अशा मृत्यूंचे प्रमाण अधिक होत असलेले विभाग अधोरेखित केले जाऊन त्यानुसार प्रतिबंधात्मक धोरण आखण्यासाठी मदत होईल, असे मत रुग्णालयाचे उपसंचालक डॉ. पंकज चतुर्वेदी यांनी व्यक्त केले.

अमेरिकेच्या 'सीडीसी'चे मार्गदर्शन

टाटा रुग्णालयाने उभारलेल्या या केंद्रामध्ये अमेरिकेच्या डिसीझ कंट्रोल अ‍ॅण्ड प्रिव्हेन्शन (सीडीसी) यांच्याकडून तांत्रिक मार्गदर्शन केले जाणार आहे. डॉक्टरांना प्रशिक्षण देण्यासाठी या केंद्राच्या माध्यमातून चार तासांचा अभ्यासक्रम तयार केला आहे. ११ भागांमध्ये असलेला हा अभ्यासक्रम ऑनलाईन आहे. या अभ्यासक्रमातून मृत्यूंच्या कारणांच्या नोंदी करण्याबाबत असलेल्या शंका दूर होऊन नोंदींचा दर्जा नक्की वाढेल, अशी आशा असल्याचे टाटा स्मारक रुग्णालयाचे संचालक डॉ. राजेंद्र बडवे यांनी सांगितले. अभ्यासक्रम ऑनलाईन असल्यामुळे ग्रामीण किंवा दूर्गम भागातील डॉक्टरांचीही सोय झाली आहे.

# पिंपरीतील वाकडमध्ये धोकादायकरित्या गॅसची चोरी; दोघ अटकेत



पिंपरी : गॅस सिलेंडरमधून गॅस चोरी केल्याप्रकरणी दोघांना अटक केली. पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या सामाजिक सुरक्षा पथकाने शनिवारी दुपारी पावणे चारच्या सुमारास वाकड रोड, वाकड येथील सिद्धनाथ गॅस सर्विस येथे ही कारवाई केली. दादा विठोबा मेटकरी (वय ३४, रा. थेरगाव), महेंद्र खियाराम ईसरवाल (वय ५०, रा. डांगे चौक, वाकड), अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत पोलीस कर्मचारी नितीन लोंढे यांनी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दादा मेटकरी याचे वाकड रोडवर सिद्धनाथ गॅस सर्व्हिस हे दुकान आहे. त्याने दुकानामध्ये इंण्डेन गॅस कंपनीचे गॅस सिलेंडर अतिप्रमाणात साठा करून ठेवले. तसेच धोकादायकरित्या एका सिलेंडरमधून दुसऱ्या सिलेंडरमध्ये गॅस चोरी केली. यासाठी त्याने कोणत्याही प्रकारची सुरक्षेची काळजी घेतली नाही. आरोपींनी घरगुती भरलेल्या सिलेंडरमधून चार किलो वजनाच्या गॅस सिलेंडर टाकीमध्ये गॅस काढून घेऊन गॅसची चोरी केली. तसेच ग्राहकांची फसवणूक केली. पोलिसांनी कारवाई करून रोख रक्कम, ॲपे रिक्षा, गॅस व इतर साहित्य, असा एकूण एक लाख २७ हजार २८७ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. सामाजिक सुरक्षा पथकाचे पोलीस उपनिरीक्षक धैर्यशील सोळंके तपास करीत आहेत.

# नागपुरात दोन हत्याकांडांचा थरार पोलिसांमध्ये उडाली खळबळ

नागपूर, उपराजधानीत गेल्या २४ तासांत दोन हत्याकांड उघडकीस आल्याने पोलिसांमध्ये खळबळ उडाली आहे. उत्तर नागपूर व दाभा येथील या घटना होत. यशोधरानगरात कुख्यात गुन्हेगाराचे अपहरण करून त्याचा खून करण्यात आला. त्यानंतर गुन्हेगाराचा मृतदेह नदीत फेकण्यात आला. ही थरारक घटना शनिवारी रात्री १० वाजताच्या सुमारास उघडकीस आली. इब्राहिमखान ऊर्फ छोटे नबीखान (वय २२, रा. बोरियापुरा) असे मृतकाचे नाव आहे. याप्रकरणी यशोधरानगर पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून सोनू ऊर्फ इमरान अहमद अली (वय २५, रा. यशोधरानगर), मोहम्मद रशीद मोहम्मद रफीक शहा (वय २५, रा. कामठी) आणि शमी टायगर अन्सारी (वय २४, रा. यशोधरानगर) या तीन मारेकऱ्यांना अटक केली. छोटे नबीखान हा कुख्यात गुंड होता. त्याच्याविरुद्ध तडीपार व एमपीडीएअंतर्गत स्थानबद्धतेचीही कारवाई करण्यात आली होती. दोन महिन्यांपूर्वी पोलिसांनी दरोड्याच्या तयारीत असणाऱ्या दरोडेखोरांना अटक केली होती. याप्रकरणात छोटे नबीखान हा फरार होता. तो यशोधरानगर परिसरात मित्राकडे राहायचा. याबाबत त्याच्या कुटुंबीयांनाही माहिती होती. सोनू आधी बोरियापुरामध्ये राहायचा. त्याचा नबीखानसोबत वाद व्हायचा. नबी आपल्याला ठार मारेल, अशी भीती सोनूला होती. त्याने नबीच्या हत्येचा कट आखला. रशीद व अन्सारीला या कटात सहभागी केले. ४ ऑगस्टला रशीदने नबीला यशोधरानगर चौकात बोलाविले. नबी तेथे गेला. त्यानंतर तिघांनी त्याला निजामुद्दीन कॉलनी परिसरात नेले. तेथे चाकू व तलवारीने वार करून नबीची हत्या केली. त्याचा मृतदेह पोत्यात टाकला व कन्हान नदीत फेकला.




दरम्यान, तीन दिवसांपूर्वी नबीचे अपहरण करून खून करण्यात आला असून यात एक जण जखमी असल्याची माहिती यशोधरानगर पोलिसांना मिळाली. पोलिसांनी जखमीचा शोध घेतला. अरबाज कुरेशी हा जखमी असल्याचे आढळले. पोलिसांनी शनिवारी त्याची चौकशी केली. 'सोनू व त्याच्या साथीदारांनी नबीचा खून केला व मला ठार मारण्याचा प्रयत्न केला', असे अरबाजने पोलिसांना सांगितले. त्यानंतर पोलिसांनी सोनू व त्याच्या साथीदारांना ताब्यात घेतले. मृतदेह कन्हान नदीत फेकल्याचे तिघांनी पोलिसांना सांगितले.

# गर्भवती मातेकडून दोन वर्षीय चिमुकलीची हत्या!; दोन दिवसांनी घटना उघड




विरार मध्ये एका गर्भवती महिलेकडून दोन वर्षीय चिमुकलीची हत्या झाल्याचा प्रकार समोर आला आहे. शनिवारी ही घटना घडली होती. सोमवारी शवविच्छेदन अहवालातून हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी महिलेवर हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विरार पुर्वेच्या फुलपाडा येथील पारिजात अपार्टमेंट या इमारतीमध्ये सोनुकूमार सोनी (३२) हा रिक्षाचालक पत्नी नेहा (२२) हिच्या सोबत राहतो. त्यांना नानसी (२) आणि १ वर्षीची अशा दोन मुली आहेत. तर, नेहा ही सात महिन्यांची गर्भवती आहे. शनिवारी संध्याकाळी नानसी घरात खेळताना पडून बेशुध्द पडल्याचे नेहाने सांगितले. तिला उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिथे तिला मृत घोषित करण्यात आले. नानसीवर विरारच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार होते. मात्र स्थानिक रहिवाशांनी याबाबत पोलिसांना कळवले. रात्री विरार पोलिसांनी याप्रकरणी अपघाती मृत्यूची नोंद केली होती.

सोमवारी नानसीच्या शवविच्छेदानाचा अहवाला आला. त्यात डोक्याला आणि पोटाला गंभीर दुखापत झाल्याचे समोर आले. त्यामुळे पोलिसांनी यामृत्यूप्रकऱणी नेहाकडे कसून चौकशी केली. त्यात हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. घरात काम करत असताना नेहाने नानसीला जोरात मारले होते. त्यात नानसी न्हाणीघराच्या दरवाज्यावर आपटली आणि खाली पडली. त्यामुळे तिचा मृत्यू झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

याप्रकरणी आम्ही नेहा सोनीच्या विरोधात हत्येचा गुन्हा दाखल केल्याची माहिती विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश वराडे यांनी दिली.

# भयावह! घरात घुसून नराधमाने केला अल्पवयीन मुलीवर बलात्कार; हतबल भावाने हात जोडून विनवणी केली पण

नवी दिल्ली - राजस्थानमध्ये माणुसकीला काळीमा फासणारी एक घटना घडली आहे. झुंझुनं येथील एका गावामध्ये अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या भयंकर घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीने 14 वर्षीय मुलीला एका खोलीत बंद केलं. मुलीने खूप आरडाओरडा केला. याच दरम्यान तिचा भाऊ आला. बहिणीच्या ओरडण्याचा आवाज ऐकून भावाने दरवाजा उघडण्याचा खूप प्रयत्न केला. मात्र दरवाजा उघडला गेला नाही. यानंतर हतबल झालेल्या भावाने हात जोडून बहिणीला सोडण्यासाठी खूप विनवण्या केल्या. पण आरोपीने काहीच ऐकलं नाही.पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, 19 वर्षीय तरुणाने याप्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. 3 ऑगस्ट रोजी बहीण घरी एकटीच होती. याच दरम्यान सोमेश नायक त्याच्या घरामध्ये जबरदस्तीने घुसला. धमकी देत आरोपीने बहिणीला एका खोलीत बंद केलं आणि तिच्यावर बलात्कार केला. घरी आल्यावर तरुणाला बहिणीच्या ओरडण्याचा आवाज ऐकू आला.



त्याने खोलीचा दरवाजा तोडण्याचा प्रयत्न केला. पण काहीच फायदा झाला नाही. त्यानंतर जवळपास दोन तास दरवाजाबाहेर उभं राहून भावाने बहिणीला सोडण्याची विनवणी केली पण आरोपीने ऐकलं नाही.तरुणाच्या मदतीसाठी कोणीच आलं नाही. त्यामुळे तो आपल्या मोठ्या बहिणीला बोलवण्यासाठी तिच्या घरी गेला. तो परत आला तेव्हा आरोपी फरार झाला होता.

# 'डेल्टा प्लस'चे राज्यात 45 रुग्ण




मुंबई : राज्यात करोना डेल्टा प्लस विषाणूचे ४५ रुग्ण आढळले आहेत. रत्नागिरीतील एका रुग्णाचा मृत्यू वगळता सर्व रुग्णांना सौम्य ते मध्यम स्वरूपाची लक्षणे आहेत. विषाणूंचे जनुकीय क्रमनिर्धारण (जिनोमिक सिक्वेन्सिग) अभ्यासण्यात येत आहे. त्यासाठी करण्यात येत असलेल्या सेंटिनल सर्वेक्षणात प्रत्येकी पाच प्रयोगशाळा व रुग्णालयांकडून दर १५ दिवसांनी १५ नमुने राष्ट्रीय विषाणू संस्था आणि राष्ट्रीय पेशी विज्ञान संस्थेला पाठविण्यात येतात. तर प्रत्येक जिल्ह्य़ातून १०० नमुने सीएसआयआर (कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्च) संस्थेला पाठविण्यात येत आहेत. डेल्टा प्लसच्या रुग्णांमध्ये १९-४५ वयोगटातील २०,१८ वर्षांखालील सहा, तर ६० पेक्षा अधिक वयाच्या पाच व्यक्तींचा समावेश आहे. या विषाणूचा प्रसार वाढू नये, यासाठी रुग्णाच्या संपर्कातील व्यक्तींचा शोध घेऊन उपाययोजना करण्यात येत आहेत.

# म्हाडाचे नऊ प्रकल्प महारेराच्या काळ्या यादीत



मुंबई : महेराकडून मुदतीत प्रकल्प पूर्ण न करणाऱ्या गृहप्रकल्पांची काळी यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. १ हजार १८० प्रकल्पांच्या यादीत मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशातील बडय़ा विकासकांच्या गृहप्रकल्पांचा समावेश आहे. यात म्हाडाचे प्रकल्पही आहेत. म्हाडाचे तब्बल नऊ प्रकल्प यादीत असून यातील आठ प्रकल्प मुंबई मंडळाचे तर एक प्रकल्प नागपूर मंडळाचा आहे. महारेरा कायद्यानुसार गृहप्रकल्प पूर्णत्वाची मुदत संपल्यानंतर वर्षाची मुदतवाढ देण्यात येते. पण ही मुदतवाढ न घेणाऱ्या वा मुदतवाढ घेऊनही त्या एका वर्षांच्या काळातही प्रकल्प पूर्ण न करणाऱ्या प्रकल्पांना 'लॅप्स प्रोजेक्ट' म्हणून काळ्या यादीत टाकले जाते. त्यानुसार प्रकल्पातील घरांची जाहिरात विकासकांना करता येत नाही की घरे विकता येत नाहीत. महारेराची स्थापना झाल्यापासून, २०१७ पासून २०२१ पर्यंतच्या अशा प्रकल्पांची यादी महारेराकडून तयार करण्यात आली आहे. यात राज्यातील ३००० हून अधिक प्रकल्पांचा समावेश आहे. २०१७ आणि २०१८ ची यादी यापूर्वीच महारेराच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. या दोन्ही यादीत ६४४ प्रकल्पांचा समावेश होता. आता नुकतीच २०१९ ची यादी प्रसिद्ध करण्यात आली असून यात राज्यातील १,१८० प्रकल्पांचा समावेश आहे. राज्यभरातील बडय़ा विकासकांचे प्रकल्प यात समाविष्ट असतानाच म्हाडाच्या प्रकल्पांचाही समावेश आहे. मुंबई मंडळाचे आठ तर नागपूर मंडळाच्या एक प्रकल्प यादीत आहे. २०१७ च्या यादीत म्हाडाचा केवळ एक तर २०१८ च्या यादीत दोन प्रकल्प होते. आता यात वाढ होऊन आकडा नऊवर गेला आहे. मुंबई मंडळाच्या अँटॉप हिल, प्रतीक्षा नगर, सिद्धार्थ नगर-गोरेगाव, कोपरी पवई, विक्र ोळी टागोरनगर, गव्हाणपाडा, तुंगा पवई आणि मानखुर्दमधील प्रकल्प यादीत आहेत. तर नागपूर मंडळाचा चिखली येथील प्रकल्प यात समाविष्ट आहे. महत्त्वाचे म्हणजे मुंबई मंडळाच्या येत्या सोडतीत जी घरे समाविष्ट करण्यात येणार आहेत, त्या घरांचा प्रकल्प यादीत आहे. त्यामुळे याचा सोडतीवर काही परिणाम होईल का वा याबाबत मुंबई मंडळाची पुढील कार्यवाही काय असेल याबाबत मंडळाचे मुख्य अधिकारी योगेश म्हसे यांना विचारले असता त्यांनी याची माहिती घेतल्यानंतर प्रतिक्रिया देऊ असे सांगितले आहे.

ग्राहकांची संमती महत्त्वाची

काळ्या यादीतील विकासकांना प्रकल्पातील ५१ टक्के ग्राहकांची संमती घेत महारेराच्या परवानगीने प्रकल्प मार्गी लावता येतात. तर ग्राहक स्वत: पुढे येत नवीन विकासक नेमत प्रकल्प पूर्ण करून घेऊ शकतात, अशी तरतूद कायद्यात असल्याची माहिती बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाच्या रेरा अँड हाऊसिंग कमिटीचे अध्यक्ष आनंद गुप्ता यांनी दिली आहे. म्हाडासाठीही हीच तरतूद आहे.

# मुंबई, ठाणे परिसरातील 500 गृहप्रकल्प अडचणीत

मुंबई : मुंबई, ठाणे एमआयडीसी, नवी मुंबई आणि रायगड भागातील बांधकामे सुरू राहावीत, यासाठी ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्याभोवती असलेल्या पर्यावरण संवेदनशील पट्टय़ासंदर्भात जारी करण्यात आलेल्या अंतिम अधिसूचनेबाबत राज्य सरकार आणि केंद्र सरकारने हस्तक्षेप करून परिणामकारक व वेगाने पावले उचलावी, अशी विनंती महाराष्ट्र चेंबर्स ऑफ हौसिंग इंडस्ट्रीज (एमसीएचआय) आणि कॉन्फर्डेशन ऑफ रिएल इस्टेट डेव्हलपर्स ऑफ इंडिया (क्रेडाई) या संघटनेतर्फे करण्यात आली आहे.



नवीन अधिसूचना जारी करण्यास विलंब केला तर तब्बल पाच लाख कोटींच्या ५०० हून अधिक गृहप्रकल्पांवर त्याचा परिणाम होईल. या प्रकल्पांतर्गत काम करणारे हजारो बांधकाम मजूर बेरोजगार होतील, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. अनेक विकासकांना या बदललेल्या नियमांतर्गत वेळेत बांधकाम सुरू करण्यासाठी आवश्यक असलेले प्रमाणपत्र मिळणार नाही, असा दावाही करण्यात आला आहे. मुंबईतील दहा किलोमीटरच्या परिघात १५ प्रभाग येतात. मुलुंड, चेंबूर, अंधेरी पूर्व, वांद्रे पूर्व, परळ, माटुंगा इत्यादी महत्त्वाच्या परिसरांमधील विकासकांना बांधकाम करण्यात अडथळा येणार आहे. परिणामी खरेदीदारांना घरांचा ताबा देणेही कठीण होईल. मुद्रांक शुल्कातील सवलत लागू न केल्यामुळे मंदावलेल्या घरविक्रीला चालना देण्यासाठी या प्रकरणी केंद्र व राज्य सरकारने तातडीने पावले उचलण्याची आवश्यकता असल्याचे मतही व्यक्त केले जात आहे. क्रेडाई—एमसीएचआयचे अध्यक्ष दीपक गोराडिया म्हणाले की, ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्याच्या भोवतालचा दहा किमीचा बफर झोन तयार करण्याची पर्यावरण मंत्रालयाची अधिसूचना मंबई महानगरपालिकेने मान्य केल्याने सर्व बांधकामांवर परिणाम झाला आहे. मुद्रांक शुल्कात सवलत दिली न गेल्याने बांधकाम व्यवसायात याआधीच नाराजी असून अधिसूचनेच्या विलंबामुळे पायाभूत सुविधा क्षेत्राला मोठा धक्का बसला आहे. याचा केवळ मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतीलच नव्हे तर मंबई महानगर क्षेत्रातील इतर भागांमध्येही परिणाम होणार आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्कः-9594418181 / 8424989898